महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३२० वे | दिनांक : २१/११/२०२६ | वार : शनिवार

'मेरिटवर शिवसेना उद्धवजींचीच'; बारामती विमानतळ निधीअभावी दादांचा अपघात झाल्याचा सुप्रिया सुळेंचा दावा



बारामती : सर्वोच्च न्यायालयातील शिवसेनेच्या पक्ष आणि चिन्हाची सुनावणी अंतिम टप्प्यात आली असताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी मोठे विधान केले आहे. "मी कोणतीही भविष्यवाणी करत नाही; मात्र गुणवत्तेच्या (मेरिट) आधारावर शिवसेना हा पक्ष कालही उद्धव ठाकरे यांचाच होता, आजही आहे आणि उद्याही त्यांचाच राहील," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. शुक्रवारी (20 नोव्हेंबर 2026) बारामती दौऱ्यावर असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बारामती विमानतळाच्या विकासासाठी मंजूर झालेला 64 कोटी रुपयांचा निधी, इंदापूरमधील मतदार यादीतून नावे वगळल्याची कथित ऑडिओ-व्हिडिओ क्लिप, दुष्काळी परिस्थिती आणि शरद पवार यांच्या बारामती दौऱ्याबाबत सविस्तर माहिती दिली. राज्य सरकारने बारामती विमानतळाच्या सुधारणा आणि विकासासाठी 64 कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल सुप्रिया सुळे यांनी या निर्णयाचे स्वागत केले. मात्र, यावेळी अजित पवार यांच्या विमान अपघाताची आठवण काढताना त्या भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. "सरकारच्या या निर्णयाचे मी स्वागत करते, 'देर आए दुरुस्त आए'. पण हा 64 कोटी रुपयांचा निधी जर दादांच्या विमान अपघातापूर्वी मंजूर झाला असता, तर कदाचित तो अपघात टळला असता आणि दादा आज आपल्यात असते," अशी हळहळ त्यांनी व्यक्त केली. आमदार रोहित पवार यांनी इंदापूर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान भाजप कार्यकर्त्यांकडून राष्ट्रवादीच्या मतदारांची नावे वगळण्याचे अर्ज केले जात असल्याची एक ऑडिओ-व्हिडिओ क्लिप शेअर केली आहे. यावर भाष्य करताना सुप्रिया सुळे यांनी आक्रमक पवित्रा घेतला: ती क्लिप मी अद्याप पाहिलेली नाही, मात्र ती तातडीने मागवून घेणार आहे. निवडणुकीच्या काळात जिल्हाधिकारी हेच सक्षम प्राधिकारी (कॉम्पिटंट अथॉरिटी) असल्याने ही क्लिप पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली जाईल. कामानिमित्त बाहेरगावी असलेल्या मूळ रहिवाशांची नावे कट करून मतदार यादीतून वगळण्याचा हा प्रकार गंभीर आहे. यापूर्वी पिंपरी-चिंचवडमध्ये असाच प्रकार घडल्यानंतर पोलीस तक्रार दाखल करण्यात आली होती; त्याच धर्तीवर इंदापूर प्रकरणातही संबंधितांवर पोलीस गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. राज्यात दुष्काळ असताना मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सुरू असलेल्या बेकायदेशीर कर्जवसुलीवर मुख्यमंत्र्यांनी कारवाईचे आश्वासन दिले आहे. राज्य सरकारने हा विषय अत्यंत संवेदनशीलपणे आणि गांभीर्याने घेऊन चुकीच्या पद्धतीने वसुली करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर ते आज पहिल्यांदाच बारामती दौऱ्यावर येत असल्याचे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. सकाळी 11.30 वाजता बारामतीतील विद्या प्रतिष्ठान येथे शरद पवार यांच्या उपस्थितीत एक अत्यंत महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत विद्या प्रतिष्ठानमधील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रकल्पाचा विकास, नवीन इमारत तसेच हार्वर्ड आणि स्टॅनफर्ड यांसारख्या अमेरिका व युरोपमधील नामांकित विद्यापीठांसोबत केल्या जाणाऱ्या सामंजस्य करारांवर (एमओयू) चर्चा होणार आहे.

उमेदवारांवर कुरघोडीचे प्रयत्न; राष्ट्रवादी-सेनेने परस्पर निर्णय घेतल्याचा शिवेंद्रराजेंचा आरोप



सातारा : सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीवरून महायुतीतील मित्रपक्षांमध्ये सुरू असलेला अंतर्गत संघर्ष आता उफाळून आला आहे. या निवडीत भाजपला डावलण्यात आल्याच्या चर्चांवर राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी शुक्रवारी (20 नोव्हेंबर) स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांचा परखड समाचार घेतला. "अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीबाबत वरिष्ठ नेत्यांकडून आलेल्या सर्व सूचना आणि सुचवलेली नावे मी फॉर्म भरण्याच्या दिवशीही वेळेवर राष्ट्रवादी व सेनेच्या नेत्यांपर्यंत पोहोचवली होती. मात्र, 'आमचा निर्णय आता झाला आहे' असे सांगत राष्ट्रवादी आणि शिवसेनेने एकत्र येऊन परस्पर वेगळा निर्णय घेतला, ही वस्तुस्थिती आहे," असा गौप्यस्फोट शिवेंद्रराजे भोसले यांनी केला आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीचा संपूर्ण घटनाक्रमच शिवेंद्रराजे भोसले यांनी माध्यमांसमोर मांडला. निवडणूक प्रक्रिया सुरू झाली तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या तिन्ही प्रमुख नेत्यांसमोर मी, मंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील उपस्थित होतो (त्या दिवशी मंत्री जयकुमार गोरे हे सोलापूरला निघून गेल्याने ते बैठकीत नव्हते). विकास सेवा सोसायटीच्या जागा सोडून उर्वरित जागांचे वाटप स्थानिक नेत्यांनी आपापल्या पातळीवर एकत्र बसून करावे आणि कुठे अडचण आल्यास हा विषय वरिष्ठांकडे आणावा, असे तिन्ही नेत्यांनी सांगितले होते. अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीबाबतही हाच फॉर्म्युला ठरला होता. मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट झाल्यानंतर आणि स्थानिक मित्रपक्षांच्या अडचणी वरिष्ठांच्या कानावर घातल्यानंतर, वरिष्ठांनी अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी काही सूचना व नावे सुचवली होती. फॉर्म भरण्याच्या आदल्या दिवशी आणि प्रत्यक्ष फॉर्म भरण्याच्या दिवशीही मी स्वतः मकरंद पाटील यांना फोन करून (त्यावेळी मकरंद आबा आणि शंभूराज देसाई एकत्रच होते) वरिष्ठांनी सुचवलेले नाव व सूचना कळवल्या होत्या. मात्र, त्यावर त्यांनी 'आमचा निर्णय झाला आहे' असे उत्तर देत राष्ट्रवादी आणि शिवसेनेने परस्पर निवडी उरकल्या. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत भाजपने युती धर्म पाळण्यासाठी मोठा त्याग केला, मात्र मित्रपक्षांकडून काही ठिकाणी दगाफटका झाल्याची खंतही शिवेंद्रराजे यांनी व्यक्त केली. "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युती तुटू नये असे सांगितले होते. माझ्याकडे स्वतःचे हक्काचे मतदान असतानाही मी युतीसाठी माघार घेतली. त्यामुळे माझ्या कार्यकर्त्यांची नाराजी मला ओढवून घ्यावी लागली, पण मी त्यांची समजूत काढली. असे असतानाही आमच्या उमेदवारांवर कुरघोड्या करण्याचे प्रयत्न केले गेले, ही वस्तुस्थिती आहे. मी वेळेवर काही पावले पटापट उचलल्यामुळे त्या कुरघोड्या पूर्णपणे यशस्वी झाल्या नाहीत, तरीही त्याचा काहीसा फटका मतदानात बसलाच," असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या परस्पर निर्णयामुळे भाजपचे वरिष्ठ नेते नाराज आहेत का, या प्रश्नावर बोलताना वरिष्ठांच्या नाराजीबद्दल मी बोलू शकत नाही, मात्र एक पक्ष म्हणून आणि देवेंद्र फडणवीस यांचा कार्यकर्ता म्हणून माझी भूमिका त्या दिवशीही स्पष्ट होती आणि आजही त्यात कोणताही बदल झालेला नाही, असे शिवेंद्रराजे भोसले यांनी ठामपणे सांगितले.

प्रॉपर्टी खरेदी-विक्रीत रोख व्यवहार पडणार महागात- २ लाखांवरील व्यवहारावर आयकर विभागाची करडी नजर

मुंबई : राज्यातील जमीन आणि स्थावर मालमत्तांच्या खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व काळ्या पैशाच्या वापराला आळा घालण्यासाठी देवेंद्र फडणवीस सरकारने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता जमीन किंवा मालमत्ता व्यवहारात २ लाख रुपयांपेक्षा अधिक रोख व्यवहार झाल्यास त्याची माहिती थेट आयकर विभागाला दिली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुद्रांक नोंदणी महानिरीक्षकांना या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश जारी केले आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे मालमत्ता व्यवहारातील आर्थिक देवाणघेवाणीवर सरकारची करडी नजर राहणार आहे. यापुढे दस्त नोंदणीच्या वेळीच व्यवहारातील रोख आणि धनादेशाद्वारे दिलेल्या रकमेची स्वतंत्र नोंदणी केली जाणार आहे. जर एखाद्या जमीन व्यवहारात एकापेक्षा जास्त खरेदीदार किंवा विक्रेते असतील, तर त्यातील प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र आर्थिक हिशोब संकलित केला जाईल. नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून या माहितीचे संकलन करून ती नियमितपणे आयकर विभागाकडे सुपूर्द केली जाणार आहे. राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमार्फत दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत 'स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन्स' (SFT) हा अहवाल थेट आयकर विभागाला पाठवला जाईल. सरकारच्या या कठोर पावलामुळे मालमत्ता व्यवहारातील करचुकवेगिरी आणि बेहिशोबी रोख व्यवहारांना मोठा आळा बसणार आहे. या निर्णयामुळे राज्याच्या रिअल इस्टेट क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणि शिस्त येण्यास मदत होणार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ नोव्हेंबर २०२६

मतविक्रीची शोकांतिका

२०-२२ वर्षांपूर्वी एका शिक्षकाने माझ्याकडे एक उद्वेगपूर्ण, तरीही गंमतीशीर अनुभव सांगितल्याचे आठवते. शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना 'मतदाराचे आत्मवृत्त' या विषयावर निबंध लिहिण्यास सांगितले होते. एका विद्यार्थ्याने हा निबंध लिहिताना असे लिहिले होते,"आता निवडणुका येतील. मग उमेदवार मत मागायला येतील. त्यावेळी मी त्यांच्याकडून खूप पैसे घेणार. त्यानंतर दुसऱ्या उमेदवाराकडूनही पैसे घेणार आणि मला वाटेल त्यालाच मत देणार. कारण हे पैसे आपलेच आहेत. हे लोक निवडून आल्यावर पैसे कमावणार आणि पुन्हा निवडणुका लढविताना पैसे वाटणार. मग मीही पैसे घेतल्याशिवाय मत देणार नाही!"एका विद्यार्थ्याने लिहिलेल्या या निबंधाबद्दल संबंधित शिक्षकाने अत्यंत व्यथित होऊन हा अनुभव मला सांगितला होता.आज हा प्रसंग आठवण्याचे कारण म्हणजे नुकत्याच पार पडलेल्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुका. या निवडणुकांमध्ये पदवीधर आणि शिक्षक हेच मतदार होते. निवडणुकीच्या दिवशी मी सोलापूर, इंदापूर आणि बारामती येथे काही कामानिमित्त उपस्थित होतो. तिन्ही ठिकाणी एकच चर्चा ऐकायला मिळत होती. पदवीधर मतदारासाठी ३,००० रुपये, तर शिक्षक मतदारासाठी १०,००० रुपये हा मताचा दर असल्याची चर्चा होती. नंतर दूरदर्शनवर आणि वर्तमानपत्रांतही विविध शहरांतील अशा प्रकारच्या बातम्या ऐकायला व वाचायला मिळाल्या.आतापर्यंत मतदानासाठी झोपडपट्टीतील लोक पैसे घेतात, अशी चर्चा ऐकायला मिळायची. त्या लोकांची गरिबी आणि अज्ञान यांमुळे असे घडत असावे, अशी आपली समजूत होती.परंतु या समजुतीला सुशिक्षित आणि बऱ्यापैकी सुस्थितीत असलेल्या पदवीधरांनी व शिक्षकांनी जबरदस्त धक्का दिला. शिक्षकांनी जर खरोखरच असे व्यवहार केले असतील, तर आता या विषयावर चर्चा करणेही व्यर्थ होय!ज्या विद्यार्थ्याच्या निबंधाबद्दल शिक्षक व्यथित झाले होते, त्या शिक्षकाला आज काय वाटत असेल? याचाच मी विचार करीत आहे.या निमित्ताने मतचोरीबद्दल जे आंदोलन सुरू आहे, त्या आंदोलनकर्त्यांना एक गोष्ट सांगावीशी वाटते. मतचोरी झाली की नाही, हे माहीत नाही; मात्र मतविक्री आता मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याचाही या आंदोलनात विचार व्हायला हवा.

डॉ. ह. ना. जगताप

मो. ९८२२ ६१५ ४६४

स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



दाभाडी : मौजे दाभाडी येथील स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले आबा यांच्या सहाव्या पुण्यतिथी निमित्त आज दि. 20 नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषद शाळा, दाभाडी येथील सर्व ५५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.वाचनालयाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.विजय भोसले यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची किट वाटप करण्यात आली. आबा यांच्या स्मृती जपण्यासाठी वाचनालयाच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो.यावेळी गावच्या सरपंच अकीलाबाई मुक्तार शहा, पंचायत समिती सदस्य मुक्तार भैय्या शहा, उपसरपंच मधुकर आदीक, पत्रकार अनिल शिरसाट यांच्यासह ज्येष्ठ नागरिक मनसुबराव विटेकर, ग्रामसेवक मुंडे साहेब, उत्तम शिरसाठ, भारत विटेकर, अंबादास सोनवणे, आकाश आदीक, सतीश आदीक, कचरू दापके, सुरेश सोनवणे, विकास आदीक, शिक्षिका महाले मॅडम, दामू आदीक, कडूबा शिरसाट, सुनील शिरसाट, सदाशिव लोखंडे आदी ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी पंचायत समिती सदस्य मुक्तार भैय्या शहा व पत्रकार अनिल शिरसाट यांनी आबांच्या आठवणींना उजाळा देत अभिवादन केले. आबांनी सहकार क्षेत्रात कार्य केले असून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अधिकारी म्हणून संपूर्ण आयुष्य काढले. तसेच दाभाडी गावातील शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत व मार्गदर्शन केले. प्राचार्य विजय भोसले यांनी गावात वाचनालयाची उभारणी करून ज्ञानाचा दीप तेवत ठेवला, त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी यावेळी केला.दाभाडी येथील ग्रंथालयात दीड हजार पुस्तके उपलब्ध असून यामध्ये कथा, कादंबऱ्या, शेतीविषयक, बालसाहित्य, स्पर्धा परीक्षेची पुस्तके अशा सर्व पुस्तकांचा समावेश आहे. तसेच दैनिक वर्तमानपत्रे, दिवाळी अंक व मॅगझिन उपलब्ध आहेत. गावातील विद्यार्थी, शेतकरी, महिला व तरुणांनी या ग्रंथालयाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी गावकऱ्यांना केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक संतोष देशमुख यांनी केले, तर आभार ग्रंथालय कर्मचारी मुनिरा शहा यांनी मानले.

हरिद्वार येथे माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर यांनी घेतले देवानंदजी बाबांचे दर्शन



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा जिंतूर-सेलू विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर यांनी हरिद्वार येथे देवानंदजी बाबांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद व दर्शन घेतले. यावेळी धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरणात झालेल्या या भेटीमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.या प्रसंगी त्यांच्यासोबत सो मीनाताई बोर्डीकर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड तसेच पंचायत समिती सदस्य बालाजी सांगळे उपस्थित होते. यावेळी देवानंदजी बाबांशी विविध विषयांवर चर्चा करून त्यांचे आशीर्वाद घेतले.रामप्रसादजी बोर्डीकर हे राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात सक्रिय असून जनसंपर्काच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असतो. हरिद्वार येथील या धार्मिक भेटीच्या निमित्ताने त्यांनी संत-महात्म्यांचे दर्शन घेऊन आध्यात्मिक समाधान प्राप्त केले.या भेटीदरम्यान उपस्थितांनीही बाबांचे आशीर्वाद घेतले. धार्मिक स्थळांना भेट देऊन संत-महात्म्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद घेण्याची परंपरा जपत ही भेट उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

सी-ट्रिपल आयटीच्या चर्चासत्रातूनउमटला आधुनिक प्रशिक्षणाचा सूर

बीड (भगवंत पाळवदे) : अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून पदवी-पदविका घेतल्यानंतरही तरुणांना नोकरीसाठी संघर्ष करावा लागतो. हीच अडचण दूर करण्यासाठी बीड जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या कौशल्यवर्धन केंद्र अर्थात सी-ट्रिपल आयटी संस्थेच्या उद्घाटनापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्वतयारी चर्चासत्र पार पडले. नियमित शिक्षण अर्धवट न सोडता तरुणांना थेट नोकरी देणारे आधुनिक प्रशिक्षण सी-ट्रिपल आयटी केंद्रातून दिले जाणार आहे. त्यामुळे आता पदवी, पदविका शिक्षणासोबतच थेट नोकरीचे आधुनिक प्रशिक्षण मिळण्यास मदत होणार आहे. कौशल्यवर्धन केंद्र अर्थात सी-ट्रिपल आयटी उदघाटनाच्या अनुषंगाने पुर्वतयारी चर्चासत्र जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडले. या चर्चासत्रास जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकिसन इघारे, टाटा टेक्नॉलॉजीजचे युवराज पाटील, श्री. आनंद यांच्यासह कौशल्य विकास विभाग, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. टाटा टेक्नॉलॉजीजचे युवराज पाटील यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे या केंद्रातील १८ विविध कोर्सेसची सविस्तर माहिती दिली. सध्या बीड केंद्रात ४ कोर्सेस सुरू करण्यात आले असून १६० उमेदवारांच्या दोन बॅचेस उपलब्ध आहेत. एका बॅचमध्ये २० प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानानुसार विद्यार्थ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या संस्थेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना आपले नियमित पदवी किंवा पदविकेचे शिक्षण सोडावे लागणार नाही. महाविद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच विद्यार्थी या केंद्रातील कोर्सेस अंशकालीन पद्धतीने सहज पूर्ण करू शकतात. विविध औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी किंवा पदविका पूर्ण केल्यानंतरही अनेक युवकांना लागलीच नोकरी मिळविण्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. युवकांची हीच अडचण ओळखून, त्यांना तात्काळ नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बीड जिल्ह्यात कौशल्यवर्धन केंद्र अर्थात सी-ट्रिपल आयटी संस्थेची उभारणी करण्यात आली आहे. चर्चासत्रादरम्यान विद्यार्थी आणि पालकांनी अभ्यासक्रमाचे स्वरूप, प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व नोकरीच्या संधींबाबत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ नोव्हेंबर २०२६

हक्काचं एटीएम, कर्तव्याचा पिन

_कवी : नागेश बोंतेवाड_*

'कर्तव्याप्रती जागरूक' नागेश बोंतेवाड यांची ही कविता भाषण नाही, ती एक मेमो आहे. जो आपण दररोज स्वतःला द्यायला हवा. सहा कडव्यांतून कवीने असं सांगितलं आहे की, आपण सगळे हक्काचं एटीएम वापरतो, पण कर्तव्याचा पिन टाकायला विसरतो. ही कविता दुसऱ्याला शिकवायला नाही, स्वतःला तपासायला आहे. म्हणूनच ती वाचताना हसूही येतं आणि टोचणीही लागते.१) कर्तव्याचा अलार्म : सकाळी वाजत नाही, आत वाजतो कर्तव्याची जाणीव प्रत्येकालाच असावी, म्हणजे ते शाळेत शिकवायचं नाही, ते आतून वाजायला हवं. मोबाईलचा अलार्म आपण स्नुझ (आता नको नंतर)करतो, तसंच कर्तव्याचाही अलार्म आपण स्नुझ करतो. उद्या करू, नंतर करू, म्हणत काम पुढे ढकलतो. कवी इथे त्याच स्नुझवर बोट ठेवतो - 'कर्तव्याची जाणीव, प्रत्येकालाच असावे. कर्तव्य करताना कधी, कामात दुर्लक्ष नसावे.' दुर्लक्ष म्हणजे काम न करणं नाही, तर काम करताना मन दुसरीकडे असणं आहे. हात फाईलवर, मन मोबाईलवर, हेच आजचं दुर्लक्ष आहे. अलार्म आत वाजला की काम पूर्ण होतं.२) अधिकाराचं माईक : आवाज मोठा, काम बारीक आपण अधिकार गाजवताना माईक घेतो, पण कर्तव्य करताना माईक बाजूला ठेवतो. कवीने हा दुटप्पीपणा पकडला आहे. अधिकार गाजवायचा असेल तर आधी कर्तव्याची जाणीव ठेवा. हक्कासोबत सेवा, म्हणजे माईकवर बोलण्याआधी मैदानात उतरा - 'अधिकार गाजवतांना, कर्तव्याची जाणीव ठेवा. हक्क अधिकारासोबत, समाजाची करावी सेवा.' अधिकार हा माईक आहे, कर्तव्य ही त्याची बॅटरी आहे. बॅटरीशिवाय माईक वाजत नाही. हाच या कडव्याचा हटके अर्थ आहे.३) सरमिसळ : हक्काचं पीठ, कर्तव्याची भेसळ 'सरमिसळ कशाला करता?' हा या कवितेतला सर्वात हटके प्रश्न आहे. सरमिसळ हा शब्दच बाजारातला आहे. आपण पीठात भेसळ करतो, तशीच आपण कर्तव्यात भेसळ करतो. कर्तव्याला फाटा देऊन लोकांना दम भरतो. म्हणजे काम करायचं नाही, पण दम मात्र द्यायचा. कवी इथे कोणाचंही नाव घेत नाही, पण प्रत्येकाला आपला चेहरा दिसतो - 'अधिकार व कर्तव्याची, सरमिसळ कशाला करता. कर्तव्याला फाटा देऊन, लोकांना का दम भरता?' फाटा देणं म्हणजे सुट्टी घेणं नाही, तर जबाबदारीतून पळून जाणं आहे. फाटा दिला की उरतो फक्त दम. आणि दमावर समाज चालत नाही.४) जागरूक नागरिक : दुसऱ्यावर नाही, स्वतःवर सीसीटीव्ही जागरूक म्हणजे दुसऱ्याची चूक शोधणं नाही. जागरूक म्हणजे स्वतःवर सीसीटीव्ही लावणं. मी माझं काम केलं का, मी रांगेत उभा राहिलो का, मी कचरा टाकला का, हे स्वतःला विचारणं. हक्काचं रक्षण संविधानात पाहावं, म्हणजे हक्कासाठी संविधानाकडे जा, पण कर्तव्यासाठी स्वतःकडे या - 'कर्तव्याप्रती जागरूक, प्रत्येक नागरिक रहावे. हक्क अधिकाराचे रक्षण, संविधानात सदैव पहावे.' जागरूक नागरिक झोपेतही कर्तव्याला विसरत नाही. तो दुसऱ्याला जागं करत नाही, आधी स्वतः जागा होतो.५) संविधान : कायद्याचं पुस्तक नाही, जगण्याचं जीपीएस कवी संविधानाला कायद्याचं पुस्तक म्हणत नाही, तर 'जीवन जगण्याचं भान' म्हणतो. भान म्हणजे जीपीएस. रस्ता चुकलो की जीपीएस सांगतो, तसंच आयुष्यात चुकलो की संविधान सांगतं. भारतीय म्हणून जगताना प्रत्येक धर्माचा मान ठेवणं, ही ओळ या कवितेला सर्वात उंचीवर नेते - 'संविधानाने दिले तुम्हाला, जीवन जगण्याचे भान. भारतीय म्हणून जगतांना, ठेवा प्रत्येक धर्माचे मान.' धर्माचा मान म्हणजे फक्त सहन करणं नाही, तर आदर करणं आहे. जीपीएस बंद केलं की आपण भरकटतो, तसंच भान बंद केलं की समाज भरकटतो.६) उणीव : खिशातली नाही, मनातली शेवटचं कडवं हे या कवितेचा सार आहे. उणीव ही पैशाची नसते, ती जाणिवेची असते. प्रत्येकाने आपलं काम केलं, तर कोणालाच कशाची उणीव भासणार नाही. एकाने रस्ता स्वच्छ ठेवला की दुसऱ्याला त्रास होत नाही. एकाने वेळेवर काम केलं की दुसऱ्याचं आयुष्य अडकत नाही. उणीव भरायचा उपाय सरकारकडे नाही, तो आपल्याकडेच आहे - 'जगतांना सर्वांनी ठेवावे, सदैव कर्तव्याची जाणीव. भासणार नाही कधीच, कोणाला कशाची उणीव.' कर्तव्य केलं की उणीव आपोआप भरून निघते. हीच या ओळीची जादू आहे.७) 'दम' : अधिकाराचं एक्सपायरी औषध 'दम' भरणं म्हणजे अधिकाराचं एक्सपायरी औषध आहे. ते तात्पुरतं काम करतं, पण समाजाला आजारी करतं. कवीने दम या शब्दातून आजच्या सत्तेचा खरा चेहरा दाखवला आहे. जो कर्तव्य करत नाही, तोच जास्त दम भरतो. कारण त्याच्याकडे दाखवायला काम नसतं, फक्त आवाज असतो - 'कर्तव्याला फाटा देऊन, लोकांना का दम भरता?' हा प्रश्न नेत्याला नाही, अधिकाऱ्याला नाही, तो प्रत्येक माणसाला आहे. घरात, कार्यालयात, रस्त्यावर, आपण कुठे दम भरतोय, हे तपासायला लावणारा प्रश्न आहे.८) दुर्लक्ष : छोटी गळती, मोठा पूर पहिल्या कडव्यातला 'दुर्लक्ष' हा शब्द छोटा वाटतो, पण तोच या कवितेचा रोग आहे. एका फाईलकडे दुर्लक्ष केलं की एका माणसाचं आयुष्य अडकतं. एका खड्ड्याकडे दुर्लक्ष केलं की अपघात होतो. दुर्लक्ष म्हणजे छोटी गळती. ती वेळीच बुजवली नाही की पूर येतो. कवीने मोठ्या भ्रष्टाचारावर न बोलता, या छोट्या गळतीवर बोट ठेवलं आहे - 'कर्तव्य करताना कधी, कामात दुर्लक्ष नसावे.' ही ओळ वाचताना कार्यालयातला तो चेहरा आठवतो, जो कामाकडे पाहतही नाही. हाच या ओळीचा खरा अर्थ आहे.९) सेवा : हक्काचं बिल हक्क मागायचा असेल, तर त्याचं बिल म्हणून सेवा द्यावी लागते. सेवा ही काही मोठी गोष्ट नाही. रांगेत उभं राहणं, कचरा न टाकणं, दुसऱ्याचा मान ठेवणं, हीच सेवा आहे. हक्क फुकट मिळत नाही, त्याची किंमत सेवा आहे. सेवा केली की हक्क मागावा लागत नाही, तो आपोआप मिळतो - 'हक्क अधिकारासोबत, समाजाची करावी सेवा.' हक्काचं बिल न भरता हक्क मागणं, म्हणजे हॉटेलात जेवून बिल न देण्यासारखं आहे. हीच या ओळीची गंमत आहे.१०) प्रश्नांची कविता : उत्तर नाही, आरसा ही कविता उत्तर देत नाही, ती प्रश्न विचारते. 'का दम भरता?', 'सरमिसळ कशाला करता?' हे प्रश्न वाचकाला अस्वस्थ करतात. कवीने भाषण दिलं नाही, त्याने प्रश्न विचारले आहेत. प्रश्न विचारणं हे भाषण देण्यापेक्षा अवघड असतं. कारण प्रश्न ऐकणाऱ्याला विचार करायला लावतो. ही कविता वाचल्यावर आपण लगेच दुसऱ्याकडे बोट दाखवू शकत नाही, आपल्याकडेच पाहावं लागतं - 'कर्तव्याप्रती जागरूक, प्रत्येक नागरिक रहावे.' जागरूक राहणं म्हणजे फक्त डोळे उघडे ठेवणं नाही, तर मन उघडं ठेवणं आहे. ही कविता मन उघडं करते.११) काव्य शैली नागेश बोंतेवाड यांची शैली साधी, सरळ, उपदेशात्मक पण टोचरी आहे. अवघड शब्द नाहीत, अलंकारांचा बोजा नाही. रोजच्या बोलण्यातले शब्द, प्रश्नार्थक ओळी, हीच त्यांची ताकद आहे. त्यांची कविता वाचताना ती लिहिलेली वाटत नाही, तर समोर उभं राहून बोललेली वाटते. कर्तव्यासारखा कोरडा विषयही त्यांनी जिव्हाळ्याने मांडला आहे. हेच त्यांच्या शैलीचं यश आहे.

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार,
महात्मा फुले
महाविद्यालय, अहमदपूर
ता.अहमदपूर जि.लातूर

नाव बदलता येतं, बाप नाही!

संविधान श्रेष्ठ आहे,
म्हणून बदलता येत नाही,
जगविख्यात निर्माता आहे,
म्हणून पचवता येत नाही!

आडवी आली जात,
अडचण झाली विचारांची,
मग सुरू झाली खेळी
कपटनीतीच्या राजकारणाची!

संविधानाला हात लावण्याची
हिंमत होत नाही,
म्हणून इतिहासाच्या पानांवर
खोडाखोड सुरू झाली!

निर्मात्याचं नाव नको,
मग दुसऱ्याचं नाव घुसडायचं,
संबंध नसतानाही
श्रेयाचं पागोटं बांधायचं!

विचार पुसता येत नाहीत,
म्हणून संदर्भ बदलायचे,
इतिहास झाकता येत नाही,
म्हणून पडदे टाकायचे!

पण एवढं लक्षात असू द्या...
नाव बदलता येतं,
इतिहासाची मांडणी बदलता येते,
संदर्भांची मोडतोड करता येते,
पण जन्मदात्याचं पितृत्व
कधीच बदलता येत नाही!

ज्याने देशाला संविधान दिलं,
त्याचं कर्तृत्व पुसणार कोण?
ज्याच्या लेखणीने समतेचा सूर्य उगवला,
तो सूर्य झाकणार कोण?

बाबासाहेबांचं नाव
तुमच्या मान्यतेवर अवलंबून नाही,
त्यांचं कर्तृत्व
तुमच्या प्रचाराचं मोहताज नाही!

लक्षात ठेवा सत्ताधीशांनो,
इतिहासाला फार काळ कैद करता येत नाही...

नाव बदलता येतं,
बाप बदलता येत नाही;
आणि बाबासाहेबांचं कर्तृत्व
खोडून काढता येत नाही!

डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार
छत्रपती संभाजीनगर

MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI MJ NEWS

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ नोव्हेंबर २०२६

जिंतूरमधून ५० वाहनांसह एसटी आरक्षण रथयात्रेत सहभागी होण्याचा निर्धार



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी सकल गोरबंजारा समाजाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर ते नागपूर अशी एसटी आरक्षण रथयात्रा आयोजित करण्यात आली आहे. या रथयात्रेत जिंतूर तालुक्यातून मोठ्या संख्येने सहभागी होण्याच्या दृष्टीने गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी जिंतूर-जालना महामार्गावरील हॉटेल साईराज येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत जिंतूर येथून तब्बल ५० वाहनांसह रथयात्रेत सहभागी होण्याचा निर्धार समाजबांधवांनी व्यक्त केला. या बैठकीस मार्गदर्शक म्हणून प्रा. संदेश चव्हाण उपस्थित होते. त्यांनी बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, समाजाची सद्यस्थिती आणि आरक्षणाच्या लढ्याची पुढील दिशा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.सकल गोरबंजारा समाजाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आवाहनानुसार, दि. ५ डिसेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून एसटी आरक्षण रथयात्रेला प्रारंभ होणार असून, जालना, सिंदखेडराजा, मेहकर, मालेगाव, वाशिम, पुसद, दिग्रस, दारव्हा, यवतमाळ व वर्धा मार्गे ही यात्रा नागपूर येथे पोहोचणार आहे. नागपूर येथे दि. ७ डिसेंबर रोजी हिवाळी अधिवेशनादरम्यान महामोर्चा व आमरण उपोषण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळेपर्यंत आदिवासी विकास विभागांतर्गत अनुसूचित जमातींसाठी असलेल्या शासकीय सुविधा, सवलती व योजनांचा लाभ समाजाला देण्यात यावा, तसेच न्यायमूर्ती ताहलियानी समितीचा अहवाल केंद्र शासनाकडे तातडीने पाठविण्यात यावा, अशा प्रमुख मागण्या शासनासमोर मांडण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.या बैठकीत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष व्ही. पी. राठोड, माजी सभापती उत्तमराव जाधव, अँड . विनोद राठोड, संघर्षयोद्धा विनोद आढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडू मामा आढे , अँड. विष्णू जाधव, परसराम पवार, रामराव राठोड, ज्ञानेश्वर राठोड, डॉ. गजानन जाधव, डी. एस. चव्हाण आणि दीपक चव्हाण यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करून रथयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.बैठकीस तालुक्यातील विविध तांड्यांमधील नायक, कारभारी, समाजातील ज्येष्ठ मंडळी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वांनी एकजुटीने पुढे येण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.बैठकीचे प्रास्ताविक जगदीश राठोड यांनी केले. सूत्रसंचालन विजय आढे यांनी केले, तर आभार प्रदर्शन माणिक चव्हाण यांनी मानले.



जयश्री मुंदडा ते पायल झांबरे व्हाया वैशाली हगवणे

साधारणपणे १९८४ च्या दरम्यान पुण्यातील एका श्रीमंत आणि प्रतिष्ठित मारवाडी समाजातील कुटुंबात जयश्री मुंदडा नावाच्या बी.एस्सी. पदवीधर महिलेने आत्महत्या केली होती. ती हुंडाबळीची घटना होती. वास्तविक, त्याकाळी बी.एस्सी. झालेल्या मुलीला एखादी नोकरी मिळणे सहज शक्य होते. परंतु सासरच्या मंडळींकडून होणारा अन्याय सहन करीत ती काही दिवस सासरी राहिली. अन्यायाचा कडेलोट झाल्यानंतर तिने आत्महत्या केली. त्याऐवजी घटस्फोट घेऊन आपण स्वतंत्रपणे जगू शकतो, असा विचार तिने का केला नाही? याचे एक कारण म्हणजे कौटुंबिक प्रतिष्ठेचे गारूड आणि दुसरे कारण म्हणजे आपल्या शिक्षणाच्या जोरावर आपण स्वतंत्रपणे जगू शकतो, असा आत्मविश्वास तिच्यामध्ये निर्माण झालेला नसणे. जवळजवळ चाळीस वर्षांनंतरही परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही, हे पायल झांबरे हिच्या आत्महत्येच्या घटनेवरून लक्षात येते. वास्तविक, पायल हीदेखील अभियंता होती. समजा, तिने अन्याय सहन न करता घटस्फोट घेऊन सासरचे घर सोडले असते, तर तिला सहजपणे नोकरी मिळवून चांगले जीवन जगणे शक्य झाले असते. अशीच घटना दोन-तीन वर्षांपूर्वी पुण्यातच घडलेल्या वैशाली हगवणे हिच्या बाबतीतही घडली. या तिन्ही उदाहरणांमध्ये दोन गोष्टी प्रकर्षाने समान दिसतात. एक म्हणजे, या तिन्ही प्रकरणांतील माहेरची आणि सासरची कुटुंबे श्रीमंत आहेत. लग्नामध्ये वारेमाप खर्च करून सामाजिक प्रतिष्ठा जपण्याचा त्यांचा अट्टहास आहे. असे असूनही सासरच्या मंडळींची अधिकाधिक पैशांची आणि संपत्तीची हाव काही संपत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, या तिन्ही घटनांतील मुली उच्चशिक्षित आहेत आणि शहरात वाढलेल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना सर्वच समाजांत घडत असतील; परंतु खोट्या प्रतिष्ठेपायी आपली आर्थिक पात्रता नसतानाही केवळ लोकांना दाखविण्यासाठी लग्नावर वारेमाप खर्च करणे आणि मुलीसाठी सामान्य कुटुंबातील योग्य मुलगा शोधण्याऐवजी श्रीमंत घराण्याशी संबंध जोडण्यासाठी आटापिटा करणे, हे मराठा समाजात मोठ्या प्रमाणात होताना दिसते. या सगळ्या सामाजिक प्रतिष्ठेच्या गदारोळात मात्र मुलींचे आयुष्य होरपळून निघत आहे. वास्तविक, एकेकाळी अगदी बालविधवा झालेल्या स्त्रियादेखील हातात खुरपे घेऊन शेतात अत्यंत कष्टाची कामे करीत आपल्या मुलांचा सांभाळ करत असत. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत त्या आपले जीवन जगत होत्या; परंतु त्या हताश होऊन आत्महत्या करीत नव्हत्या. आज मात्र आमच्या मुली उच्चशिक्षण घेऊनही स्वतंत्रपणे आणि स्वाभिमानाने जगू शकतील, असा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये आपल्या शिक्षणव्यवस्थेने निर्माण केलेला नाही, हेही तितकेच खरे! आणि इकडे आपण लक्ष दिले नाही तर अशाच जयश्री, वैशाली , पायल बळी जात राहतील . माझे जगणे आणि तेही स्वाभिमानाने जगणे, हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. आणि मी स्वतःच्या हिमतीवर असे जीवन जगू शकते,' असा ठाम विश्वास आपल्या शिक्षणव्यवस्थेने मुलींमध्ये निर्माण करायला हवा. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविणे किंवा नोकरी मिळविण्यासाठी पात्रता संपादन करणे नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य, स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता आणि स्वाभिमानाने जीवन जगण्याची मानसिक ताकद निर्माण करणे होय. त्याचबरोबर विवाह जुळविताना नेमके काय पाहायला हवे, याचे भान पालकांबरोबरच या सुशिक्षित मुलींनाही असायला हवे. मुलाचे आर्थिक आणि सामाजिक स्थान पाहण्यापेक्षा त्याचा स्वभाव, विचार, स्त्रियांविषयीचा दृष्टिकोन, कुटुंबातील वातावरण आणि परस्परांबद्दलचा आदर या गोष्टींना अधिक महत्त्व दिले पाहिजे. शेवटी, लग्नातील प्रतिष्ठेपेक्षा मुलीचे आयुष्य महत्त्वाचे आहे आणि समाजाच्या प्रतिष्ठेपेक्षा तिचा स्वाभिमान अधिक महत्त्वाचा आहे, हे प्रत्येक पालकाने आणि प्रत्येक मुलीने लक्षात ठेवायला हवे.

डॉ. ह. ना. जगताप
मो. ९८२२ ६१५ ४६४

एसटी चालकाला मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : किरकोळ कारणावरून कर्तव्यावर असलेल्या एसटी चालकाला मारहाण केल्याच्या घटनेची परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणातील संबंधित आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांना दिले.रस्त्यावर हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी एसटी चालकाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करताना मंत्री सरनाईक म्हणाले, एसटीचे चालक आणि वाहक ऊन, पाऊस तसेच दिवस-रात्र यांची तमा न बाळगता लाखो प्रवाशांच्या सेवेसाठी कर्तव्य बजावत असतात. अशा कर्मचाऱ्यांवर हात उगारणाऱ्या प्रवृत्तींची गय केली जाणार नाही. एसटी कर्मचारी एकटे नाहीत. त्यांच्या सन्मानाला आणि सुरक्षिततेला धक्का पोहोचवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या गुंडगिरीला महामंडळ खपवून घेणार नाही. महामंडळ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.कर्तव्य बजावत असताना अशा प्रकारच्या घटनांना सामोरे जावे लागणाऱ्या कर्मचाऱ्यांनी घाबरून न जाता अथवा कोणत्याही दबावाखाली न येता तातडीने एसटी महामंडळाच्या मुख्यालयाशी संपर्क साधावा. त्यांना महामंडळाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही मंत्री सरनाईक यांनी दिली.गणवेश परिधान करून शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्याला मारहाण करणे ही गंभीर बाब असून, अशा घटनांमुळे कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची होते. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या चालक आणि वाहकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित आरोपींविरुद्ध लागू कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हे दाखल करावेत. तसेच दोषींवर कठोर कारवाई करून अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही मंत्री सरनाईक यांनी पोलीस प्रशासनाला दिले.एसटीचे चालक आणि वाहक हे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा महत्वाचा कणा आहेत. त्यांच्या कर्तव्यात अडथळा आणणे, त्यांना धमकावणे अथवा मारहाण करणे अशा प्रकारांना आळा बसणे आवश्यक आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक परिस्थितीत महामंडळ त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असा ठाम निर्धार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ नोव्हेंबर २०२६

राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत जय उचाडे याला कांस्यपदक



नांदेड (प्रतिनिधी) : सांगली येथे झालेल्या राज्यस्तरीय महिला- पुरुष बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या जय उचाडे या विद्यार्थ्याने कांस्यपदक पटकावले. वसंतराव नाईक महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचा खेळाडू जय उचाडे याचा एका कार्यक्रमात भव्य सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. सांगली जिल्ह्यातल्या सर्जेराव यादव प्रतिष्ठान ईश्वरपूर आणि एस. के. इंटरनॅशनल सैनिक स्कूल रेठरे धरण येथे १ली युथ (यू- १९) महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग स्पर्धा २०२६ घेण्यात आली. या स्पर्धेत ६०-६५ किलो वजन गटात महाविद्यालयाचा जय उचाडे याने उल्लेखनीय कामगिरी करत स्पर्धेत कांस्यपदकासह तृतीय क्रमांक पटकावला. जय उचाडे याचा महाविद्यालयातर्फे सत्कार करताना प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांनी त्याचे कौतुक केले. भविष्यात राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सुद्धा उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाचा नाव लौकिक वाढवण्यासाठी त्याला शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाची विद्यार्थी जय उचाडे यशामुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला आहे, असे सांगून महाविद्यालयातील इतर विद्यार्थी खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम, शिस्त, आत्मविश्वास आणि जिद्द जोपासत क्रीडा क्षेत्रात आपापले भरीव योगदान देण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव तसेच संस्थेचे सचिव एडवोकेट श्रीनिवास जाधव यांनी या यशाबद्दल शुभेच्छा पाठवल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा. डॉ.बाळासाहेब मोरे, प्रा. डॉ. राहुल सरोदे, प्रा. डॉ. महेश जाधव आदी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातील प्राध्यापकांचेही यावेळी प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांनी अभिनंदन केले.

कार्तिकी एकादशी यात्रेसाठी एसटीच्या एक हजार जादा बसेस सज्ज

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : येत्या 21 नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे संपन्न होणाऱ्या कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार एसटी महामंडळाने सुमारे एक हजार जादा बसेस सज्ज ठेवल्या आहेत. या माध्यमातून भाविकांना सुरक्षित, आरामदायी आणि विश्वासार्ह प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकी एकादशीलाही वारकरी संप्रदायात विशेष महत्व आहे. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही संबोधले जाते. त्यामुळे या पवित्र पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक पंढरपूरमध्ये दाखल होतात. चंद्रभागेच्या पवित्र तीरावर भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनुपम सोहळा अनुभवायला मिळतो.भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने पंढरपूर येथील चंद्रभागा बसस्थानकातून राज्यातील विविध भागांसाठी जादा बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे. दर्शनानंतर भाविकांना आपल्या गावी परतण्यासाठीही पुरेशा बसगाड्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. गर्दीचे नियोजन, बसफेऱ्यांचे व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महामंडळाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे.एसटी महामंडळाच्या माध्यमातून अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा, तर 65 ते 75 वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना तिकिटाच्या दरात 50 टक्के सवलत दिली जाते. या सवलतींचा लाभ घेत भाविकांनी खासगी वाहनांऐवजी एसटीच्या सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवाससेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.'भक्तीचा प्रवास असो वा परतीची वाट, वारकऱ्यांच्या सेवेसाठी एसटीची लालपरी सदैव सज्ज आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि आनंददायी व्हावा, यासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध आहे,' असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

दुष्काळाच्या नावाखाली फायनान्सवाल्याचा बळी जात आहे

दुष्काळाच्या नावाखाली
बळीराजाची कानपिळी होत आहे
बळीराजाच्या नावाखाली
फायनान्सवाल्यांचा बळी जात आहे

महागाई पेटली
हमीभाव घटला
जंगलं गिटली
पाऊसपाणी-पाणवठे आटले

कपड्यांच्या दुकानात गर्दीच गर्दी
सोनाराच्या दुकानात गर्दीच गर्दी
वाहनांच्या शोरुमला गर्दीच गर्दी
रजिस्ट्री ऑफिसला गर्दीच गर्दी

दुष्काळाच्या नावाखाली
बळीराजाची कानपिळी होत आहे
बळीराजाच्या नावाखाली
फायनान्सवाल्यांचा बळी जात आहे

खऱ्या गरजूवंत बळीराजाला
बेगरजू बळीराजानं खाल्लं आहे
शासन फक्त समाधान करत आहे
मूळ प्रश्न वंचितच ठेवला आहे

ज्याच्या शेतात वर्षातून
दोनदा-तीनदा पिकणार
त्या बागायती क्षेत्रालाही
सरकारने पाच हजार मदत दिली

ज्या शेतकऱ्याच्या शेतात
वर्षभर काहीच पिकणार नाही
अशा जिरायती रानांना
सरकाने पाचच हजार मदत दिली

गरजूवंताच्या मागे बेगरजू लपतो आहे
गरजूवंताच्या ताटातलं बेगरजूही खातो आहे
दुष्काळाच्या नावाखाली
सगळेच हात धुऊन घेत आहे

मूळ लाभार्थी जिरायती रान-बरडवाले
सरसकट भरपाई त्यांच्याच झोळीत टाकणं
जिरायती शेतकऱ्यांचा तो खरा अधिकार आहे
खऱ्या गरजूवंत शेतकऱ्याला भिकारीच ठेवणं
हे शासनाचं कसलं उलटंच धोरण आहे..?

ज्याची परिस्थिती बिकट आहे, त्याला
बँकवाले, फायनान्सवाले समजून घेतच आहे
बिकट परिस्थितीचं ढोंग करणारे
दुष्काळामागे लपत आहे
गरजूवंताच्या मागे बेगरजू लपतो आहे

सिबिल खराब झाल्यामुळे
बँक-फायनान्सची दारं बंद होत आहे
बळीराजा गावसावकारी कर्जाला बळी पडत आहे
बँक-फायनान्सच्या कर्जामुळे नाही, तर
गावसावकारी कर्जामुळे आत्महत्या होत आहे

दुष्काळाच्या मुंडक्यावर दणका देऊन टाका
पीककर्जासारखं, होम लोन, व्हेईकल लोन, ट्रॅक्टर लोन,
पर्सनल लोन, एज्युकेशन लोन, सोसायटी लोन
सरसकट कर्जमाफीचा गुलाल उधळून टाका

नाही काही तर
थोड्यात-थोडकं,
बिनव्याजी मॉरिटोरियमचा
जी.आर. तरी देऊन टाका

सारे दंड-फिंड झिरो करा
खराब सिबिल तेवढं चांगलं करा
NPA खाते तरी रेग्युलर करा
फायनान्सवाल्यांचे रोजगार टिकतील
त्या लाखो बेरोजगारांवर दया करा

तोफेच्या तोंडी फायनान्सवाल्यांना धरु नका
दुष्काळाच्या नावाखाली
फायनान्सवाल्यांना बळीचा बकरा करु नका
गावसावकऱ्यांच्या रोषाचं खापर
फायनान्सवाल्यांच्या माथी फुटत आहे

दुष्काळाच्या नावाखाली
बळीराजाची कानपिळी होत आहे
बळीराजाच्या नावाखाली
फायनान्सवाल्यांचा बळी जात आहे

- लक्ष्मण वाल्डे

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ नोव्हेंबर २०२६

दुष्काळाचा सामना करण्यासाठी शासन, नागरिकांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक

धाराशिव (भगवंत पाळवदे) : सध्याचा काळ अत्यंत कठीण आहे. दुष्काळासारख्या संकटावर मात करण्यासाठी एकमेकांच्या सहकार्याची गरज आहे.शासन आणि नागरिक यांनी एकत्रित काम केल्यासच जलसंवर्धनामध्ये यश मिळू शकते,असे प्रतिपादन माननीय राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले. पुढच्या वेळी जेव्हा या गावात येईन,तेव्हा बलसूर गावचा कायापालट झालेला दिसेल, असा विश्वासही राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी व्यक्त केला. १९ नोव्हेंबर रोजी उमरगा तालुक्यातील बलसूर येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रमात राज्यपाल श्री.जिष्णू देव वर्मा बोलत होते.याप्रसंगी आमदार प्रवीण स्वामी,माननीय राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, प्रा.सुरेश बिराजदार,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता विजयकुमार थोरात आदींसह वरिष्ठ अधिका-यांची उपस्थिती होती.जिल्हा प्रशासन सध्या तात्कालिक आणि दीर्घकालीन अशा दोन स्तरांवर काम करत आहे. तत्कालिक उपाययोजनांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जनावरांसाठी चारा,प्रत्येक घरात रोजगार पोहोचवण्याचे नियोजन केले जात आहे. नागरिकांना दिवाळीपूर्वी आर्थिक मदत म्हणून पाच हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे,पुढील मदतही दिली जाणार आहे. दीर्घकालीन उपाययोजनांतर्गत भविष्यात पाण्याची टंचाई भासू नये, म्हणून मशीनच्या साहाय्याने नाले रुंद व खोल करण्याचे काम सुरू आहे.तसेच, जलसंवर्धनाच्या कामात 'पाणी फाउंडेशन'चीही मदत घेतली जात आहे,असेही राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले. ग्रामस्थ गोविंद देवणे यांनी कृषी सिंचन आणि बाळासाहेब मोरे यांनी जिल्ह्याला २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला.यावर ग्रामस्थांनी मांडलेले मुद्दे रास्त आहेत.त्याबाबत प्रशासनाशी नक्कीच चर्चा केली जाईल, असे आश्वासनही राज्यपाल यांनी ग्रामस्थांना दिले. "दुष्काळ काही कायमस्वरूपी समस्या नाही, आपण ती नक्कीच सोडवू शकतो,यासाठी एकमेकांची सोबत असणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून ग्रामस्थांनी प्रशासनाला विधायक सूचना देऊन आणि सहकार्य करून आपण या संकटावर मात करूया,"असे आवाहनही राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले. त्रिपुराचा अनुभव आणि जलसंवर्धनाचे महत्त्व स्वतःच्या त्रिपुरा राज्याचा अनुभव सांगताना राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले,"मी ज्या त्रिपुरा राज्यातून येतो, तिथेही डोंगराळ भाग असून पाण्याचे मोठे संकट असते. मी तिथे मंत्री आणि उपमुख्यमंत्री असताना लोकांना नेहमी पाणी वाचवण्याचे आवाहन करायचो." यंदा पाऊस ५० टक्क्यांनी कमी झाला आहे. गेल्या वर्षी पाऊस जास्त होता,तेव्हा आपण पाण्याची काळजी केली नाही आणि भरपूर खर्च केला.त्यामुळेच आता टंचाई जाणवत आहे. जलसंवर्धन केवळ बोलून होत नाही,तर प्रत्येक व्यक्तीने त्यात सहभागी होणे गरजेचे असल्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले.या कार्यक्रमात आमदार प्रवीण स्वामी यांनी १९९३ च्या भूकंपातील गावांमधील काही योजना परिपूर्ण करण्यात याव्यात,याबाबत विनंती केली.शिवाय आंध्रप्रदेश,तेलंगणा आणि महाराष्ट्रातून दरवर्षी किमान १० लाख भाविक उमरगा मतदारसंघातून तुळजापूरला पायी जातात.महामार्गालगत चालताना होणाऱ्या अपघातांत वर्षाला किमान 10 जणांचा मृत्यू होतो,असे अपघात टाळण्यासाठी महामार्गाला लागून ८ ते १२ फूट रुंदीचा पदपथ (पेडेस्ट्रियन पाथ) उभारण्याची योजना तयार करण्याबाबत सूचित करावे, असेही आमदार स्वामी यांनी सांगितले. श्री.बिराजदार यांनीही उमरगा आणि लोहारा तालुक्यात दुष्काळामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत विविध मागण्या मांडल्या. सुरूवातीला राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात प्रशासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचे सविस्तर सादरीकरण जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पूजार यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यासमोर केले. यावेळी जिल्ह्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, चारा उपलब्धता, जलसंधारणाची कामे, शेतक-यांना आर्थिक मदत तसेच रोजगार हमी योजनेंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांची माहिती सादर केली.गावातील पीक-पाणी, दुष्काळी उपाययोजनांची पाहणी बलसूर गावातील शेती,पीक - पाणी परिस्थिती,दुष्काळी परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांची पाहणी करत येथील ग्रामस्थांशी संवाद साधला.गावातील पीक व चारा लागवड,साठवण तलाव आदींची पाहणी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केली. धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील जकेकूर येथे राज्यपाल विष्णू देव वर्मा यांचे हेलिकॉप्टरने आगमन झाले. आगमनानंतर त्यांनी उमरगा तालुक्यातील बलसूर याठिकाणी रमेश हिंगमिरे यांच्या शेतातील 1.82 हेक्टरवरील पेरूच्या बागेची पाहणी केली.तसेच शेतकरी माधव नामा कांबळे यांच्या शेतात ज्वारी पिकाची पाहणी केली.तसेच शेतकरी माधव कांबळे यांच्याशी पीक परिस्थितीबाबत माहिती जाणून घेत त्यांच्याशी त्यांच्या बांधावर संवाद साधला.तर बलसूर येथीलच माणिक साखरे यांच्या 3. 42 हेक्टरवरील ऊस पिकाचीही त्यांनी पाहणी केली.नाला सरळीकरण कामाचे उद्घाटनबलसुर ग्रामपंचायतच्या सहभागातून तयार करण्यात येत असलेल्या राम वाकडे (लेंडकी) ते यासीन डांगे यांच्या शेतापर्यंत असलेल्या नाला सरळीकरण कामाचे उद्घाटन माननीय राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते करण्यात आले.सध्या कोरड्या असलेला बलसुर साठवण तलाव क्रमांक 2 यास भेट देऊन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी तलाव परिस्थितीची पाहणी केली.या तलावाचा परिसरातील नागरिकांना लाभ होतो,सध्या गाळपेरा क्षेत्रात चारा लागवड करण्यात आल्याचे पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.थोरात यांनी सांगितले.

ग्रामीण युवकांना उद्योजकतेकडे नेणारी महत्वाकांक्षी योजना

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि युवतींना पशुधनाधारित व्यवसायांद्वारे उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देणाऱ्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'चा शुभारंभ संविधान दिनी, 26 नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेली ही योजना पूर्णतः ऑनलाइन स्वरूपात राबविण्यात येणार असून, शुभारंभाच्या दिवसापासून इच्छुकांना अर्ज करता येणार आहेत, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, पशुसंवर्धन विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण युवकांना उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने ही महत्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. ग्रामीण युवकांना उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून सकारात्मक आणि स्वयंपूर्णतेच्या दिशेने मार्गस्थ करणे, तसेच दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागाला दिलासा देणे, हा या योजनेमागील उद्देश आहे.

योजनेच्या पूर्वतयारीसाठी विभागाने बारकाईने व व्यापक प्रमाणात कामे केली असून, विविध जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षणही देण्यात आले आहे. या प्रशिक्षणांमध्ये हजारोंच्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे.योजना संपूर्णपणे ऑनलाईन ; अर्ज भरण्यापूर्वी फार्मर आयडी, महाआयडी तयार करावा

शासकीय सॉफ्टवेअर व तंत्रज्ञानविषयक कामकाज महाआयटीच्या माध्यमातून करण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, या योजनेसाठीची ऑनलाइन प्रणाली विकसित करण्याची जबाबदारी महाआयटीकडे सोपविण्यात आली होती. पशुसंवर्धन विभाग आणि महाआयटी यांनी समन्वयाने ही प्रणाली विकसित केली असून, तिच्या विविध चाचण्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. योजनेतील अर्ज, माहितीची नोंद, प्रकल्प निवड, खर्चाचा अंदाज आणि अनुदानासंदर्भातील प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अर्जापूर्वी आपला फार्मर आयडी आणि महाआयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन मंत्री मुंडे यांनी केले आहे. या ओळखपत्रांच्या निर्मितीसंदर्भातील माहिती पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.शेळीपालन, कुक्कुटपालन, वराहपालनही योजनेअंतर्गत अर्जदाराला आपल्या व्यवसायाच्या गरजेनुसार विविध पर्याय निवडता येणार आहेत. गाय आणि म्हैस यांसारख्या मोठ्या पशुधनासह शेळीपालन, कुक्कुटपालन तसेच वराहपालन या घटकांसाठी अर्ज करता येईल. काही भागांमध्ये वराहपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने या घटकाचाही योजनेत समावेश करण्यात आला आहे. वराहपालनासंदर्भात काही ठिकाणांहून निर्यातीची मागणीही प्राप्त झाली आहे. संबंधित व्यवसायासाठी आवश्यक असलेले शेड तसेच हायड्रोपोनिक चारा व्यवस्थेचे पर्यायही अर्ज प्रक्रियेत उपलब्ध असतील, असेही त्यांनी सांगितले. ऑनलाइन अर्जामध्ये अर्जदाराने निवडलेल्या पशुधन व आवश्यक सुविधांनुसार प्रकल्पाचा खर्च प्रणालीद्वारे निश्चित करण्यात येईल. संबंधित प्रकल्पासाठी लागू असलेली अनुदानाची रक्कम वजा करून उर्वरित गुंतवणुकीची रक्कम अर्जदारास ऑनलाइन प्रणालीवर दर्शविण्यात येईल. अर्जदाराला प्रकल्पाशी संबंधित खर्च व अनुदानाची रक्कम अर्ज प्रक्रियेदरम्यान उपलब्ध होणार आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.योजनेचा ग्रेस पीरियड वाढविणार

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून योजनेतील ग्रेस पीरियड वाढविण्यात येत असल्याचेही मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि युवतींना अशा परिस्थितीत पशुधनाधारित व्यवसायासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देणे, त्यांना रोजगार व उद्योजकतेकडे मार्गस्थ करणे हा योजनेचा उद्देश आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील नव्या पिढीला स्वयंपूर्णतेकडे नेण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्याला उद्दिष्ट निश्चित करून देण्यात आले आहे. प्राप्त अर्जांवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. योजनेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन भविष्यात उद्दिष्ट वाढविण्याची गरज भासू शकते, असेही मंत्री मुंडे यांनी नमूद केले. प्राप्त अर्जांची स्थिती आणि विविध भागांतील प्रतिसाद लक्षात घेऊन पुढील टप्प्यात समूहाधारित पद्धतीने (क्लस्टर) पशुधन व्यवसाय विकसित करण्यासंदर्भात नियोजन करता येणार आहे. योजनेच्या प्रारंभी अर्ज प्रक्रियेस सुरुवात करण्यात येणार असून, त्यानंतरच्या टप्प्यात क्लस्टर पद्धतीने विकासाचा विचार करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. योजनेच्या अर्ज प्रक्रियेबाबत, आवश्यक माहितीसंदर्भात तसेच विविध घटकांच्या निवडीबाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जदारांनी महा आयडी आणि फार्मर आयडी तयार करून ऑनलाइन अर्ज प्रक्रियेत सहभागी व्हावे. योजनेविषयी शंका अथवा अधिक माहितीसाठी नागरिकांनी 1962 या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002